पादचारी दिवसाचा राजा, अन्य दिवसांचे काय?

लोकजागर

सुजित तांबडे
sujit.tambade
@expressindia.com

पुण्यामध्ये कोणतीही नवीन योजना आली की, त्यावर खल केल्याशिवाय आणि सर्वांगाने साधक-बाधक चर्चा केल्याशिवाय तिला मान्यता मिळत नसते. पुणे महापालिकाही कधी कधी काहीतरी चांगल्या योजना आखते; पण सरकारी पद्धतीने तिची अंमलबजावणी केल्यावर पुणेकर सवयीप्रमाणे त्रुटी काढून टीका करतात. 'पादचारी दिन'ही त्यातील एक संकल्पना. ११ डिसेंबरला कागदोपत्री एक दिवसासाठी का होईना, पादचारी हा राजा आहे, असे भासवून पुणेकरांना लक्ष्मी रस्त्यावर भर दिवसा मुक्तपणे संचार करण्याची संधी महापालिकेने दिली, हेही नसे थोडके! हा दिन साजरा झाला आणि सरकारी सोपस्कार पूर्ण झाले. पुन्हा पदपथांचा कब्जा विक्रेत्यांनी घेतला आणि पादचाऱ्यांची अवस्था दीनवाणी झाली. त्यामुळे आता महापालिकेने वर्षांतून एकदा पादचारी राजा, असे न दाखवता पादचाऱ्यांना मोकळा श्वास घेण्यासाठी कायमस्वरुपी योजना आखण्याची वेळ आली आहे.

पुण्यातील रस्ते हे अरुंद असल्याने उपलब्ध रस्त्यांमधून पादचाऱ्यांना वाट काढत मार्गक्रमण करावे लागत असते. पदपथावरील विक्रेते आणि माणसे यातून मिळेल त्या मार्गातून चालण्याची पादचाऱ्यांची कसरत महापालिका वर्षानुवर्षे बघत आली आहे. त्यामुळे त्यांनी ११ डिसेंबर हा एक दिवस पादचाऱ्यांसाठी देण्याची संकल्पना सुरू केली आहे. नागरी रस्त्यांच्या आराखड्यामध्ये पादचाऱ्यांच्या सुरक्षाविषयक मार्गदर्शक तत्वानुसार ही योजना आखण्यात आली. त्यानुसार शहरातील रस्त्यांवर सुरक्षितपणे चालण्यासाठी झेब्रा क्रॉसिंग, दिशादर्शक फलक आदी उपाययोजना करण्यात येत असल्याचा महापालिकेचा दावा आहे. त्यामध्ये नागरी सहभाग असावा, यासाठी दरवर्षी ११ डिसेंबर हा दिवस 'पादचारी दिन' साजरा करण्याचे निश्चित केले आहे. त्यासाठी लक्ष्मी रस्ता निवडण्यात आला आहे. यंदा या रस्त्यावर पुणेकरांनी एक दिवस मुक्त संचार करून आपण एक दिवसाचे का होईना राजे आहोत, हे दाखवून दिले.

एक दिवस पादचाऱ्यांसाठी दिल्यानंतर महापालिका ३६४ दिवस पादचाऱ्यांसाठी काय करते, हा प्रश्न आहे. अतिक्रमणविरोधी कारवाई केली जाते. त्यानंतर पुन्हा तीच स्थिती होते. त्यामुळे पादचारी हा कायम पदपथाऐवजी 'रस्त्यावर' असतो. दरवर्षी महापालिकेच्या अर्थसंकल्पात नावीन्यपूर्ण संकल्पना मांडण्यात येत असतात. मात्र, त्याची अंमलबजावणी किती होते, याकडे लक्ष दिले जात नाही. महापालिका प्रशासनाने यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये पथ विभागासाठी १०७० कोटी रुपयांची भांडवली तरतूद करून वेगवेगळ्या योजना आखल्या आहेत. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि नवीन पर्यायी मार्ग निर्माण करण्यासाठी 'मिसिंग लिंक डेव्हलपमेंट' हा प्रकल्प राबविण्याचा महापालिकेचा मनसुबा आहे. त्यामध्ये डी.पी. रस्त्यांना जोडणारी 'मिसिंग लिंक' विकसित करून मध्यवर्ती वर्तुळाकार मार्ग वाहतुकीसाठी केला जाणार आहेत. पर्यायी वाहतुकीसाठी अशा प्रकारचे ३३ मिसिंग लिंक विकसित करण्याची ही योजना आहे. ही योजनाही कागदोपत्री चांगली दिसत आहे.

'मिशन-१५' ही आणखी एक आगळीवेगळी संकल्पना. या संकल्पनेअंतर्गत शहरातील वाहतुकीचे प्रमाण जास्त असलेले मुख्य रस्ते निश्चित केले जाणार आहेत. त्यावरील कोंडी टाळण्यासाठी उपाययोजना करण्याचे नियोजित आहे. पादचारी सुरक्षा व्यवस्थेला या संकल्पनेत स्थान देण्यात आले आहे. अर्थसंकल्पातील या दोन योजना पुणेकरांना कोंडीमुक्त करण्यासाठी आखण्यात आल्या असल्या, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी करणार, हे आव्हान असणार आहे. 'मिसिंग लिंक डेव्हलपमेंट' या योजनेअंतर्गत रस्ते एकमेकांना जोडण्यासाठी ते अतिक्रमणमुक्त असण्याची शक्यता कमी आहे. ती अतिक्रमणे काढून रस्ते जोडण्याचे आव्हान असणार आहे. 'मिशन-१५'मध्ये प्रमुख रस्ते निवडून तेथील कोंडी सोडविण्याचा प्रयत्न असणार आहे. मात्र, उर्वरित रस्त्याचे काय?

पादचारी दिनासाठी निवडण्यात आलेला लक्ष्मी रस्ता हा एक दिवसासाठी कोंडीमुक्त झाला. मात्र, त्या दिवशी आजुबाजूला पादचाऱ्यांना चालणे मुश्किल झाल्याचा कटू अनुभव पुणेकरांनी घेतला. हा रस्ता तयार करतानाच तत्कालीन नगरपालिकेला अनेक अडथळ्यांची शर्यत करावी लागली होती. हा रस्ता बनविण्याचा प्रस्ताव तत्कालीन नगरपालिकेने १९०८ मध्ये आणला. मात्र, या प्रस्तावाला १९१४ मध्ये मंजुरी मिळाली. मात्र, १९२० पर्यंत रस्ता तयार करण्याच्या कामाला फारसा वेग आला नव्हता. रुंदीकरणासाठी जागा ताब्यात घेणे, बाधितांना मोबदला देणे यामध्ये विलंब लागला. त्यामुळे मूळची योजनेत बदल करावा लागला होता. त्यानंतर १९४९ ते १९५२ या काळात हा रस्ता पूर्ण झाला. पादचारी दिनासाठी निवडलेल्या लक्ष्मी रस्त्याच्या जन्माची ही कहाणी आहे. एक रस्ता तयार करताना महापालिकेला किती समस्यांना तोंड द्यावे लागते, याचे लक्ष्मी रस्ता हे एक उदाहरण आहे. हा अनुभव विचारात घेऊन महापालिकेने 'मिसिंग लिंक डेव्हलपमेंट' आणि 'मिशन-१५' या योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होण्यासाठी प्रयत्न केले, तर पादचारी पदपथांवरून राजासारखा चालू शकतो. पादचारी दिन हा एक दिवस आणि एका रस्त्यावर करून हेतू साध्य होणार नाही. शहरातील विविध भागांमध्ये नागरिकांच्या सहकार्याने हा उपक्रम वर्षभर राबविण्याची योजना महापालिकेने तयार करण्याची आता वेळ आली आहे. तरच वर्षानुवर्षे कोंडलेला पादचाऱ्यांचा श्वास मोकळा होईल.

बालक, महिलांना 'मनोधैर्य'चा आधार

जिल्हा विधि सेवा प्राधिकरणामार्फत ७४० पीडितांना मदतीचा हात

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : अत्याचाराला बळी पडलेले बालक, महिला तसेच ॲसिड हल्ल्यात जखमी झालेल्या पीडितांना 'मनोधैर्य' योजनेमुळे आधार मिळाला आहे. गेल्या सहा वर्षांत ७४० पीडितांना तीन कोटी ८३ लाख ८९ हजार रुपयांच्या मदतीचा हात देण्यात आला आहे. जिल्हा विधि सेवा प्राधिकरणार्फत मिळालेल्या या मदतीमुळे पीडितांना वैद्यकीय उपचार, शिक्षण, विधिसेवा उपलब्ध झाली आहे.

आत्मसन्मान

वर्ष	मंजूर अर्ज	मिळालेली भरपाई
२०१८-१९	७३	१५,९०,०००
२०१९-२०	६६	३३,२५,०००
२०२०-२१	६०	२३,८०,०००
२०२२-२३	२९२	६३,२५,०००
२०२२-२३	४१	६६,५००००
२०२३-२४	२०८	१,७८,१९,५००
२०२४ (सप्टेंबरपर्यंत)	२५	३,००,०००

> अत्याचार प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा होणे आवश्यक आहे. पीडित महिला आणि बालकांना पुन्हा आत्मसन्मानाने उभे राहता यावे, यासाठी मनोधैर्य योजना सुरू करण्यात आली आहे. अत्याचार प्रकरणात पीडित महिलेचा मृत्यू होणे, मानसिक धक्का बसणे, गंभीर इजा झाल्यास दहा लाखांपर्यंत मदत दिली जाते. खटल्याच्या सुनावणी दरम्यान पीडित महिला फितूर झाल्यास देण्यात आलेली मदत व्याजासह वसूल करण्याचे अधिकार समितीला देण्यात आले आहेत.
> – **सोनल पाटील**, सचिव पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण

शाळकरी मुली, बालक, तसेच महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढीस लागल्या आहेत. अत्यचााराला बळी पडलेल्या महिला, बालकांना आर्थिक मदतीबरोबरच त्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी शासनाने 'मनोधैर्य' योजना सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून पीडितांना मदत देण्याबरोबरच त्यांना आत्मसन्मानाने उभे राहता यावे, या विचाराने जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून २०१८ पासून ७४० पीडितांना मदत देण्यात आली आहे.

पीडितांना भरपाई मिळण्याची प्रक्रिया कशी?

अत्याचार प्रकरणात दाखल गुन्ह्याची प्रत (प्रथम माहिती अहवाल-एफआयआर), न्यायालयासमोर दिलेल्या जबाबाची प्रत, वैद्यकीय पुराव्यांसह विधी सेवा प्राधिकरणात 'मनोधैर्य' योजनेअंतर्गत देण्यात येणारी मदत मिळवण्यासाठी अर्ज सादर करावा लागतो. अर्जाची छाननी करण्यात येते. वैद्यकीय खर्चासाठी अर्जदाराला त्वरीत ३० हजार रुपयांची मदत दिली जाते. भरपाईची उर्वरित रक्कम मंजूर झाल्यानंतर ती दहा वर्षांसाठी अर्जदाराच्याा नावे दहा वर्षांसाठी मुदत ठेव म्हणून ठेवण्यात येते. या समितीत प्रमुख जिल्हा न्यायाधीश, विधि सेवा प्राधिकरणाचे सचिव, ससूनचे वैद्यकीय अधिकारी, पोलीस अधिकारी, तसेच समाजसेवकांचा समावेश असते. भरपाई मिळालेली पीडित महिला फितूर झाल्यास किंवा न्यायालयीन सुनावणी दरम्यान तिने जबाब बदलल्यास भरपाईची रक्कम वसूल केली जाते. एखाद्या प्रकरणात खोटी तक्रार दिल्याचे सिद्ध झाल्यास अर्थसाह्य जमीन महसुली कायद्याप्रमाणे वसूल करण्याचे अधिकार आहेत. अशी माहिती पुणे जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाकडून देण्यात आली.

'पादचारी दिना'चे फलित काय?

सुरक्षिततेसाठी उपाययोजना केल्याचा महापालिकेचा दावा

लोकसत्ता प्रतिनिधी

> पादचारी दिनानिमित्त लक्ष्मी रस्त्यासह शहरातील ३५ चौकांमध्ये पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती कामे करण्यात आली. यासाठी ४७ लाख रुपयांची तरतूद होती. त्यातील नक्की किती निधी खर्च झाला आहे, याची माहिती पुढील आठवड्यात स्पष्ट होईल.
> – **अनिरुद्ध पावसकर**, पथ विभागप्रमुख

पुणे : लक्ष्मी रस्त्यावर 'पादचारी दिना'चा घाट घालण्यासाठी पुणे महापालिकेने ४७ लाख रुपये खर्चाची तरतूद केली खरे, पण याचे नेमके फलित काय, याबाबत अजूनही पुरेशी स्पष्टता आलेली नाही. लक्ष्मी रस्त्यावर या दिवशी वाहनमुक्ती असताना त्याला समांतर रस्ते कोंडीने ग्रासले आणि वाहनचालकच काय, पादचाऱ्यांनाही वाट काढणे मुश्किल झाले. अशा वेळी पादचाऱ्यांची सुरक्षितता, त्यांचा रस्त्यावर चालायचा हक्क याबाबत जनजागृती करण्याचा पालिकेचा उद्देश नक्की किती सफल झाला, याचे उत्तर नागरिक शोधत आहेत.

लक्ष्मी रस्ता बुधवारी सकाळी आठ ते रात्री आठ या वेळात वाहनांसाठी बंद ठेवून केवळ पादचाऱ्यांसाठी खुला करण्यात आला होता. हा सुट्टीचा दिवस नसल्याने लक्ष्मी रस्ता परिसरातील शाळांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होऊन सकाळीच वाहनमुक्त योजनेत शिथिलता आणावी लागून काही चौकांतून वाहतूक सुरू करावी लागली. लक्ष्मी रस्त्यावर वाहने आणायची नसल्याने या रस्त्यावरील दुकानांत कामे करणाऱ्यांची वाहने लावण्याची पंचाईत झाली. त्यातील अनेकांनी शेजारच्या गल्लीबोळांत वाहने लावल्याने तेथून चालणेही मुश्किल झाले. त्यात वाहतूक कोंडीची भर पडली, ती वेगळीच. त्या दिवशी, सकाळी आणि दुपारी फार कमी पादचारी लक्ष्मी रस्त्यावर आले. त्यामुळे आजूबाजूच्या दुकानांना फायदा होण्याऐवजी उलाढाल मंदावल्याचा अनुभव आला. पालिकेच्या पथ विभागाचे म्हणणे आहे, की पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजनांसाठी ४७ लाख रुपयांच्या तरतुदीतून खर्च करण्यात आला. या निधीतून लक्ष्मी रस्त्यावर पदपथांची दुरुस्ती, पदपथांवरील कठड्यांना रंग देणे, रस्त्यावर पांढरे पट्टे मारणे, मार्गिकांची आखणी करणे, दुभाजकांची दुरुस्ती करून रंगरंगोटी केली. शहरातील प्रत्येक विभागाच्या अखत्यारितील सात चौकांत, अशी पाच विभागांत ३५ चौकांत महापालिकेने कामे करण्यात आली आहेत.

दोन टपाल कार्यालयांच्या सेवा वेळेमध्ये वाढ

पुणे : नागरिकांच्या मागणीची दखल घेत दक्षिण पुण्यातील कात्रज आणि धनकवडी टपाल कार्यालयांच्या रजिस्टर, स्पीड, पार्सल बुकिंग सेवेच्या वेळेत वाढ करून ती दुपारी साडेचारपर्यंत करण्यात आली आहे. स्थानिकांच्या मागणीस अनुसरून पुणे शहर पश्चिम विभागामार्फत कात्रज आणि धनकवडी टपाल कार्यालयांच्या सेवावेळेत वाढ करण्यात आली आहे.

या सुविधांसाठी पूर्वी धनकवडी टपाल कार्यालयाची वेळ सकाळी नऊ ते दुपारी अडीच तर, कात्रज टपाल कार्यालयाची वेळ सकाळी नऊ ते दुपारी दोन अशी होती. वाढत्या शहरीकरणाने स्थानिक नागरिकांच्या सुविधेसाठी सदर वेळ वाढविण्यात आलेली असून, कात्रज आणि धनकवडी टपाल कार्यालय सोमवार ते शनिवार या कालावधीत सकाळी नऊ ते दुपारी साडेचारपर्यंत खुले असेल, असे पुणे शहर पश्चिम विभागाच्या प्रवर अधीक्षक रिप्पन डुल्लेट यांनी कळविले आहे.

'सीडब्ल्यूपीआरएस'मध्ये 'हायड्रो २०२४' परिषद

पुणे : खडकवासला येथील केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्रात (सीडब्ल्यूपीआरएस) 'हायड्रोलिक्स, वॉटर रिसोर्सेस, रिव्हर ॲण्ड कोस्टल इंजिनिअरिंग-हायड्रो २०२४' या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. १८ ते २० डिसेंबर या कालावधीत ही परिषद होणार आहे.

इंडियन सोसायटी फॉर हायड्रोलिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. 'सीडब्ल्यूपीआरएस'चे संचालक डॉ. आर. एस. कांकरा यांनी ही माहिती शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी अतिरिक्त संचालक आणि आंतरराष्ट्रीय परिषद आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. प्रभात चंद्र उपस्थित होते. 'सीडब्ल्यूपीआरएस' जल, ऊर्जा क्षेत्र आणि किनारपट्टी संबंधित पैलूंमध्ये नाविन्यपूर्ण संशोधनावर लक्ष केंद्रीत करत आहे. यामध्ये प्रकल्पाचे परिणाम वाढविण्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्ता, मशीन लर्निंग (एमएल) सारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा समावेश आहे. भविष्यात शाश्वत आणि अनुकूल उपाय विकसित करण्यासाठी हवामान बदलाच्या प्रभावांचा अभ्यास सीडब्ल्यूपीआरएसकडून केला जात आहे, असे कांकरा यांनी स्पष्ट केले.

संक्षिप्त

'पेशवाई क्रिएशन'चा वर्धापन दिन साजरा

पेशवाई क्रिएशनने नुकताच आपला ३१ वा वर्धापन दिवस आपल्या ग्राहकांसोबत मोठ्या उत्साहाने साजरा केला. दत्तात्रय पेदण्णा येमूल यांनी १९९३ मध्ये पेशवाई क्रिएशनची मुहूर्तमेढ रोवली. विनम्र सेवा, वाजवी दर आणि निवडीला भरपूर वाव ह्या वैशिष्ट्यांमुळे पेशवाई अल्पावधीतच ग्राहकांच्या पसंतीस उतरले. पेशवाईच्या वर्धापनदिनी ग्राहकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. तसेच यंदाच्या वर्षी, लग्नाचे मुहूर्त असल्याने अजूनही ग्राहकांची गर्दी होत आहे.

टीजीएच ऑन्कोचा केमोथेरपी विभाग सुरू

तळेगाव दाभाडे येथील टीजीएच-ऑन्को लाईफ कॅन्सर सेंटरमध्ये १२ रुग्णशय्येची व्यवस्था असलेला डे-केअर केमोथेरेपी कक्ष सुरू करण्यात आला आहे. या कक्षाचे उद्घाटन नर्गिस दत्त फाउंडेशनच्या अध्यक्षा प्रिया दत्त यांच्या उपस्थितीत झाले. कार्यक्रमाला टीजीएच ऑन्को लाईफ कॅन्सर सेंटरचे संस्थापक अध्यक्ष गणेश खांडगे, अध्यक्ष शैलेश शाह, सचिव सत्यजित वाढोकर, ऑन्को लाईफ कॅन्सर सेंटरचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक उदय देशमुख आदी उपस्थित होते. ऑन्को लाइफ हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक सचिन देशमुख व सेंटर प्रमुख डॉ. संतोष साहू यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट -IV-A - अचल मालमत्तेची ई-लिलाव जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

नोंदणीकृत कार्यालयः 9 वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-110001, फोन्सः 011-23357171, 23357172, 23705414, वेब.: www.pnbhousing.com

शाखाः खराडीः तिसरा मजला, गणलक्ष्मी कॉम्प्लेक्स, सर्व्हे क्र. 08, हडपसर खराडी बायपास रोड, खराडी, पुणे, महाराष्ट्र- 411014, **औरंगाबादः** ई-1, ई-2 आणि ई-3, चौथा मजला, औरंगाबाद बिझनेस सेंटर, अदालत रोड, औरंगाबाद, महाराष्ट्र- 431001, **कोंढवाः** 560, पाचवा मजला, मार्वल व्हिस्टा, स. क्र. 599ए = 598+593ए, साहनी सुजन पार्क, लुल्ला नगर, पुणे, महाराष्ट्र- 411040, **अहमदनगरः** युनिट क्र.- 203, दुसरा मजला, साई मिडास टच, नगर- मनमाड रोड, पंचशील हॉटेल जवळ, सावेडी, अहमदनगर, महाराष्ट्र- 414003

याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ- डी मध्ये नमूद अचल मालमत्तेचा मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकारयांनी रचनात्मक / प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ- सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची **''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे''** तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल.
याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम इ 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार / गहाणदार / कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला **www.pnbhousing.com** येथे भेट द्यावी.

कर्ज क्र., कर्जदार / सह- कर्जदार / जामीनदार / कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	तारण मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आ. कि.) (ई)	बयाणा रक्कम (आ. कि. च्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीचा दिनांक व वेळ (आय)	लिलावाचा दिनांक व वेळ (जे)	असल्यास, ज्ञात बोजे / न्यायालयीन कज्जे (के)
HOU/KRDI/0419/674646 अनुराग उदय भार्गव/ दिव्या भार्गव शाखा : खराडी	रु. 3257821.30 285479 आणि 16-01-2024	प्रत्यक्ष ताबा	बिल्डिंग ई 14वा मजला 1408 ऑप्टिमा हाइट्स स क्र 460 पोस्ट केसनंद हवेली पुणे पुणे महाराष्ट्र - 412207 भारत.	रु. 3243000	रु. 324300	30-12-24	रु. 10000	20.12.24 रोजी दु. 12:00 ते दु. 04:00 दरम्यान	31.12.24 रोजी दु. 02:00 ते दु. 03:00 दरम्यान	ज्ञात नाही
HOU/ARNG/0519/693795 कविता भास्कर सौंदरमल/ रंजना भास्कर सौंदरमल शाखा : औरंगाबाद	रु. 1593506.05 आणि 15-07-2022	प्रत्यक्ष ताबा	सिंगल बिल्डिंग 2रा मजला 201 व्यंकटेश रेसिडेन्सी प्लॉट क्र 55 गट क्र 14 नाथ व्हॅली स्कूल रोड जवळ कांचनवाडी औरंगाबाद महाराष्ट्र - 431001 भारत.	रु. 1263000	रु. 126300	30-12-24	रु. 10000	20.12.24 रोजी दु. 12:00 ते दु. 04:00 दरम्यान	31.12.24 रोजी दु. 02:00 ते दु. 03:00 दरम्यान	ज्ञात नाही
HOU/KNDW/0818/567025 देविदास बापू वाघुले/ रोहिणी देविदास वाघुले शाखा : कोंढवा	रु. 1103321.68 आणि 19-02-2020	प्रत्यक्ष ताबा	विंग बी, 4था मजला, 404.0, प्रिस्टाइन पूर्वरंग, स क्र 733(पी), पेरणे, ता. हवेली, जिल्हा पुणे, पुणे, महाराष्ट्र - 412207, भारत.	रु. 540000	रु. 54000	30-12-24	रु. 10000	23.12.24 रोजी दु. 12:00 ते दु. 04:00 दरम्यान	31.12.24 रोजी दु. 02:00 ते दु. 03:00 दरम्यान	ज्ञात नाही
NHL/AHMD/0519/695666 उमेश रमाकांत निंबाळकर/ जयश्री उमेश निंबाळकर शाखा : अहमदनगर	रु. 9938818.08 आणि 31 जानेवारी-20	प्रत्यक्ष ताबा	हॉल क्र. 2, पहिला मजला, शांभवनाथ कॉम्प्लेक्स, सीटीएस क्र 2225ए, दालमंडई, पिंजर लेन अदाते बाजार जवळ, नगर, अहमद नगर, महाराष्ट्र- 414001, अहमद नगर, भारत (850 चौ. फू.)	रु. 2917000	रु. 291700	30-12-24	रु. 10000	19.12.24 रोजी दु. 12:00 ते दु. 04:00 दरम्यान	31.12.24 रोजी दु. 02:00 ते दु. 03:00 दरम्यान	ज्ञात नाही

*सोबत भरण्याच्या व / वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकारयांच्या माहितीनुसार वर स्तंभ - के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल / अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे / दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने / बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार / बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी.
(1) आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता / अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल / पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकारयांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकुम नाही आणि स्थितीचा उल्लेख स्तंभ क्रमांक- के मध्ये केला आहे.
(2) संभाव्य खरेदीदारांनी / बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ - के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया / आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथेपर्यंतचे मर्यादित नसून त्यांनी निविदा / बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तींवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.
(3) कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार / खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल अन्यथा अशा ठेवी चुकवल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रीच्या पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या 15 दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचे काही भाग जप्त करेल आणि मालमत्ता / अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल.
(4) सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकारयांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्रमांक 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003 वेबसाइट - www.bankeauctions.com मालमत्तेची तपासणी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत व्यक्ती पंकज तिवारी / अमोल मानेम, मनोजकुमार सोलंकी, टोल फ्री : 1800 120 8800, ई-मेल : auction@pnbhousing.com यांचेशी संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

ठिकाणः पुणे, दिनांक : 14.12.2024
स्वा./- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड IDFC FIRST Bank

(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते) | CIN: L65110TN2014PLC097792
नोंदणीकृत कार्यालयः केआरएम टॉवर्स, आठवा मजला, हॅरिंग्टन रोड, चेटपेट, चेन्नई- 600031.
टेली : +91 44 4564 4000 | फॅक्स : +91 44 4564 4022

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 च्या अनुच्छेद 13(2) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार व सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)** कडून खाली नमूद सुरक्षित कर्जे घेतली होती. खाली नमूद कर्जदार व सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तांचे तारण ठेवून सुरक्षित करण्यात आले होते. ते संबंधित कर्ज करारातील अटी व शर्तीचे पालन करण्यात असमर्थ ठरल्याने व ते अनियमित झाल्याने त्यांची कर्जे आरबीआय च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अनुत्पादक मत्ता म्हणून वर्ग करण्यात आलेली आहेत. खालील तक्त्यात जारी करण्यात आलेल्या संबंधित सूचनांनुसार त्यांना **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)** यांना देय असणारया संबंधित रकमा देण्यात आलेल्या आहेत आणि त्यांवर पुढील व्याजही लागू असेल आणि हे व्याज त्यांच्या संबंधित दिनांकापासून करारातील दराने आकारण्यात येईल.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>कर्ज खाते क्र.</th><th>कर्जाचा प्रकार</th><th>कर्जदार व सह-कर्जदाराचे नाव</th><th>अनुच्छेद 13(2) सूचना दिनांक</th><th>अनुच्छेद 13(2) सूचनेनुसार थकबाकी रक्कम</th></tr>
<tr><td>1</td><td>93905369</td><td>मालमत्तेवरील कर्ज</td><td>1. भानुदास संपत धनवटे
2. जनाबाई संपत धनवटे</td><td>27.11.2024</td><td>रु. 2,68,189.88/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ताः पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, मालमत्ता मिळकत क्र. 0772 ग्रामपंचायत आंबळे च्या रजिस्टर मध्ये, आर.सी.सी. बांधकाम मोजमाप एकूण क्षेत्रफळ 952 चौ. फू. म्हणजे 88.44 चौ. मी., गावः आंबळे, ता. शिरूर जिल्हाः पुणे, महाराष्ट्र- 412211 येथे स्थित, आणि चतुःसीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः पांडुरंग मंदिर पूर्वी सामायिक चौक, पश्चिमः रस्ता आणि ग्रामपंचायतीची मालमत्ता, उत्तरः पांडुरंग मंदिर आणि सामायिक चौक, दक्षिणः ग्रामपंचायतीची मालमत्ता.</td></tr>
<tr><td>2</td><td>42208380</td><td>गृह कर्ज</td><td>1. मालती भगवानराव लांडगे</td><td>11.09.2024</td><td>रु. 18,14,628.76/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ताः पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र. 902, मोजमाप 36.25 चौ. मी. (कार्पेट क्षेत्रफळ), सोबत संलग्न समान पातळी बंदिस्त बाल्कनी क्षेत्रफळ सुमारे 2.84 चौ. मी., आणि तसेच सोबत संलग्न समान पातळी टेरेस / ड्राय टेरेस/खुली बाल्कनी क्षेत्रफळ सुमारे 8.76 चौ. मी., "लक्ष्मी विश्व" मधील बिल्डिंग/विंग क्र. "सी" च्या नवव्या मजल्यावर, जमीन संबंधित गट क्र. 41 आणि 42 यावर बांधलेले, गावः मेदनकरवाडी, तालुकाः खेड, जिल्हाः पुणे, महाराष्ट्र- 410501 येथे स्थित, आणि चतुःसीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः फ्लॅट क्र. 908, पश्चिमः खुली जागा, उत्तरः फ्लॅट 903, 904, दक्षिणः जिना</td></tr>
<tr><td>3</td><td>111128398</td><td>गृह कर्ज</td><td>1. संतोष बाळासाहेब चव्हाण
2. सुरेखा बाळासो चव्हाण</td><td>14.11.2024</td><td>रु. 3,06,123.66/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ताः पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, ग्रामपंचायत मिळकत क्र. 512/1, दगड, माती आणि गवताच्या शेडमधील बांधकामाचे मोजमाप = 20 X 25 फूट. = 500 चौ. फू., आणि खुला प्लॉट क्षेत्रफळ 25 X 30 फू. = 750 चौ. फू., शिंदोडी येथे स्थित, गाव शिंदोडी, ता. शिरूर, जिल्हा : पुणे च्या ग्रामपंचायत हद्दीत आणि उप निबंधक शिरूर, महाराष्ट्र- 412210, आणि चतुःसीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः दाता शितोळे यांची मालमत्ता, पश्चिमः प्राथमिक शाळा, उत्तरः आनंदा बापू ओहोळ यांची मालमत्ता, दक्षिणः सिंधुबाई दौंडकर यांची मालमत्ता.</td></tr>
<tr><td>4</td><td>117826651</td><td>मालमत्तेवरील कर्ज</td><td>1. शिवकुमार नामदेव थोरात
2. शोभा नामदेव थोरात</td><td>30.11.2024</td><td>रु. 8,32,113.25/-</td></tr>
<tr><td colspan="6">मालमत्तेचा पत्ताः पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, ग्रामपंचायत मिळकत क्र. 85, दगड विटा आणि सिमेंट मध्ये बांधकामाचे मोजमाप 33 X 25 फू. = 825 चौ. फू., आरसीसी बांधकाम 40 X 29 फू. = 1160 चौ. फू., एकूण बांधकाम= 1985 चौ. फू., चिंचणी येथे स्थित, गाव चिंचणी, ता. शिरूर च्या ग्रामपंचायत हद्दीत, आणि उप निबंधक, शिरूर, जिल्हा पुणे, महाराष्ट्र- 412211, आणि चतुःसीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः मच्छिंद्र मुंगसे यांचे घर, पश्चिमः गणेश विलास डिंबर यांचे घर, उत्तरः रस्ता, दक्षिणः अलका रामराव पवार यांचे घर.</td></tr>
</table>

याद्वारे आपणांस सदर सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत वरील तक्त्यात दर्शविलेल्या तपशिलानुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडशी विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)** यांना आपणाकडून घेणे असलेल्या रकमेचा त्यांच्या संबंधित दिनांकापासूनच्या कंत्राटी दरावरील व्याजासह आणि इतर खर्च व शुल्कांसह भरणा करण्याचे आवाहन करण्यात येते. असे न केल्यास निम्नस्वाक्षरीकारांना **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)** यांना घेणे असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी वर नमूद तारण मालमत्तेविरुद्ध सर्फेसी अधिनियमाच्या अनुच्छेद 13(4) व अनुच्छेद 14 अंतर्गत नाईलजाने पावले उचलावी लागतील. याशिवाय आपणांस सदर अधिनियमाच्या अनु. 13(13) अंतर्गत सदर अनामत मत्तेचे विक्री / भाडेपट्टी किंवा इतर कोणत्याही पद्धतीने हस्तांतरण करण्यास प्रतिबंध करण्यात येतो.

दिनांकः 14.12.2024
स्थानः पुणे, महाराष्ट्र

स्वा/- प्राधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)

इंडियन बैंक Indian Bank
इलाहाबाद ALLAHABAD

अंचल कार्यालय, पुणे २रा मजला, हर्मीस वेव्हस सेंट्रल एव्हेन्यू रोड, लेन क्र.३, कल्याणी नगर, पुणे ४११००६. **Ph.: 020-26656663/26656660 Email- z043@indianbank.co.in**

ई-लिलाव ३०.१२.२०२४

परिशिष्ट-४-ए नियम ८(६) मधील तरतूद पहावी अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

ई-लिलाव विक्री सूचना सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदीसह वाचलेल्या आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी आहे. याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण/आकारणी केली आहे, ज्याचा **ताबा इंडियन बँक**, अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे. **इंडियन बँक,** सिक्युर्ड क्रेडिटर, **दि. ३०.१२.२०२४ रोजी जसे आहे तसे, जसे आहे तसे आणि जे काही आहे** या आधारावर त्याच्या देय रकमेच्या वसुलीसाठी विक्री करण्याचे ठरविले आहे. राखीव किंमत आणि मालमत्तेचे तपशील जोडलेले आहे.

अ. क्र.	कर्जदार / जमिनदार / गहाणदार यांचे नाव आणि शाखेचे नाव	सांकेतिक / प्रत्यक्ष ताबा असलेले स्थावर मालमत्तेचे वर्णन आणि मालमत्ता क्रमांक	सुरक्षित कर्जाची रक्कम	आरक्षित रक्कम/ ईएमडी
१	कर्जदार: **मेसर्स ग्रोथ टेक्सटाइल इंडिया प्रा. लि.** डायरेक्टर: **अल्लाबक्ष दादासो मुजावर, शानज अल्लाबक्ष मुजावर, इम्रान अल्लाबक्ष मुजावर, तबस्सुम इम्रान मुजावर, इरफान अल्लाबक्ष मुजावर, रजिया इम्रान मुजावर** इचलकरंजी शाखा	**(प्रतिकात्मक ताबा)** औद्योगिक जमनि आणि इमारतीचा सर्व तुकडा आणि पार्सल, **गट नं. ९२३ भाग जवळील लक्ष्मी सहकारी औद्योगिक वसाहत लि. हातकणंगले मणेरे टेक्सटाईलच्या मागे, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि कोल्हापूर इम्रान अल्लाबक्ष मुजावर व इरफान अल्लाबक्ष मुजावर यांच्या नावे आहे. चतु:सिमा :- पूर्व:** अंतर्गत रस्ता, **पश्चिम:** मौलीक सरकार यांची मालमत्ता, **उत्तर:** अण्णासो फुलारी यांची मालमत्ता, **दक्षिण:** कोरोची गावाची हद्द **IDIB6577044175**	**दि. १३.१२.२०२४** रोजी देय रक्कम **रु. ६,६०,३६,८२९/-** (रुपये सहा कोटी साठ लाख छत्तीस हजार आठशे एकोणतीस फक्त) मागणी सूचना वसूली आणि खर्च, शुल्क व इतर खर्च डबलु.ई.एफ. **दि. १४.१२.२०२४ पर्यंत**	आरक्षित रक्कम **रु. ६,२०,००,०००** ईएमडी **रु. ६२,००,०००**

baanknet.png Indianbank_tenders geotag

बोली रक्कम जमा आरक्षित किंमतच्या १0%	ईएमडी रक्कमसोबत कागद पत्र जमा करण्याची अंतिम तारिख व वेळ	बोलीचे वाढीव मूल्य : रु ५0,000/- आहे

वर नमूद केल्याप्रमाणे अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) रक्कम ऑनलाइन किंवा वेबसाईटवरून (https://baanknet.com) बिडर्स ई-वॉलेटमध्ये जमा करण्यासाठी चलन तयार केल्यानंतर भरली जाईल. NEFT हस्तांतरण कोणत्याही शेड्यूल्ड कमर्शियल बँकेतून केले जाऊ शकते. रक्कम चेक सारख्या इतर कोणत्याही मोडद्वारे ईएमडी स्वीकारले जाणार नाही. आवश्यक ईएमडी ऑनलाइन जमा न करणाऱ्या बोलीदारांना ई-लिलावात भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही. बयाणा ठेवीवर कोणतेही व्याज असणार नाही.

ई-लिलाव https://baanknet.com मार्गे ईएमडी तारखेला किंवा त्यापूर्वी निविदा भरून नोंदणी पूर्ण करावी आणि ग्लोबल वॉलेट मध्ये ईएमडी शिल्लक असावी

ई-लिलावाची तारीख आणि वेळ **दि. ३०.१२.२०२४ ला सकाळी १0.00:00 ते संध्याकाळी १७.00:00 पर्यंत.** (अनियमीत वेळे पर्यंत) https://baanknet.com च्या प्लॅटफॉर्मवर. (सेवा प्रदात्याचे प्लॅटफॉर्म)

भाराचा तपशील | येथे वर्णन केलेल्या मालमत्तेवर प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम माहिती आणि माहितीचा कोणताही बोजा नाही. अधिक तपशील आणि अटी आणि नियम डाउनलोड करण्यासाठी, कृपया येथे भेट द्या:, https://www.indianbank.in & https://baanknet.com

शीर्षक दस्तऐवज, मालमत्ता आणि त्याची तपासणी याविषयी पडताळणीसाठी, इच्छुक बोलीवार **१६/१२/२०२४ ते २१/१२/२०२४ वेळ सकाळी १0.00 ते सायं. ५.00** वा. दरम्यान कार्यालयीन वेळेत इंडियन बँक शाखेशी संपर्क साधू शकतात.

ई-लिलावासाठी प्लॅटफॉर्म (https://baanknet.com)आमच्या ई-लिलाव सेवा प्रदाता पीएसबी. अलायन्स प्रा. लि., युनिट १, तिसरा मजला, व्हीआयओएस कमर्शियल टॉवर, वडाळा ट्रक टर्मिनलजवळ, वडाळा पूर्व, मुंबई – ४०० ०३७ (संपर्क फोन ८२९१२२०२२०, ईमेल आयडी:-support.ebkray@psballiance.com). इच्छुक बोलीदार/खरेदीदारांनी ई-लिलाव सेवा प्रदात्याच्या https://baanknet.com या वेबसाइटवर ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेणे आवश्यक आहे.

दिनांक : १३/१२/२०२४, स्थळ : इचलकरंजी
टीप : वरील दिलेल्या तारखेस या विक्रीचे आयोजन करण्याबाबत व इतर तपशिलाने वरील कर्जदार / गहाणदार / जमानतदाराकरीता ही सूचना आहे.
मूळ इंग्रजी जाहिरात ग्राह्य धरावी
प्राधिकृत अधिकारी इंडियन बँक